

# १. सुभाषितमाला – १।

**विषयप्रवेश -**

- शब्दार्थ
- भाषांतर
- स्वाध्याय

## शब्दार्थ –

१) शारद = शरद ऋतुतील
२) सर्वदा = सर्व काही देणारी
३) संन्निधि = जवळ
४) संन्निधि = चांगल्याचा साठा
५) वर्ण = रंग
६) सौरभ = सुगंध
७) मरुस्थल्याम् = वाळवंट
८) क्षुधार्ते = भुकेने व्याकुळ झालेल्या
९) साधव: = सज्जन
१०) शुर्पवत् =सुपाप्रमाणे
११) विसृज्य = टाकून
१२) चालनी इव = चाळणीप्रमाणे
१३) दोषग्राही = दोष ग्रहण करणारा
१४) नृणाम् = माणसांना
१५) तदाशिषा = त्यांच्या आशीर्वादाने
१६) आप्नोति = मिळवतो
१७) नेच्छन्ति = इच्छा करत नाहीत
१८) नित्यश: = नेहमी
१९) सूपचारै = चांगल्या उपचारामुळे
२०) वेला = वेळ
२१) वरम् = श्रेष्ठ
२२) फलेन = सफल हो
२३) सद्य = ताबडतोब
२४) साधुसमागम = सज्जनांचा सहवास
२५) मधुना = मधाने
२६) मधुरायते = गोड होते
२७) कटुत्वम् = कडूपणा

## भाषांतर

➢ **शारदा शारदाम्भोजवदना वदनाम्बुजे।**
सर्वदा सर्वदाऽस्माकं सन्निधिं सन्निधिं क्रियात्॥१॥

उत्तर: सर्व काही देणारी, शरद ऋतुतील कमळाप्रमाणे प्रसन्न मुख धारण करणारी सरस्वती आमच्या मुखकमलामध्ये (आमच्या जवळ) सदैव चांगल्या (विद्या) निधी राहील असे करो

➢ **वर्णेन सौरभेणापि संपन्नं कुसुमं यथा।**
**क्रियया फलितं वाक्यं तथा लोके विराजते॥२॥**

उत्तर: ज्याप्रमाणे रंगीबेरंगी तसेच सुगंधाने युक्त फूल शोभते, त्याप्रमाणे जगात कृतीने सफल झालेले बोलणे शोभून दिसते.

➢ **मरुस्थल्यां यथा वृष्टि: क्षुधार्ते भोजनं तथा।**
**तथा दरिद्रे यद्यानं दीयते सफलं हि तत्॥३॥**

उत्तर: ज्याप्रमाणे वाळवंटात पाऊस, तसेच भुकेने व्याकुळ झालेल्याला जेवण, त्याप्रमाणे धनहीनाला जे दान दिले जाते ते सफल होते.

➢ **विसृज्य शूर्पवद्दोषान गुणान् गृहन्ति साधव:।**
**दोषग्राही गुणत्यागी चालनीव हि दुर्जन:॥४॥**

उत्तर: सज्जन सुपाप्रमाणे दोषांचा त्याग करुन गुण ग्रहण करतो, दुष्ट मनुष्य चाळणीप्रमाणे दोष ग्रहण करुन गुणांचा त्याग करतो.

➢ **माता पिता गुरुश्चेति त्रयो वन्द्या नृणां सदा।**
**आयुर्विद्या बलं चेति त्रीण्याप्नोति तदाशिषा ॥५॥**

उत्तर: आई, वडील आणि गुरु हे तिघे माणसांना नेहमी वंदनीय आहेत. त्यांच्या आशीर्वादाने (मनुष्य) आयुष्य, विद्या आणि सामर्थ्य या तीन गोष्टी मिळवतो.

DNYANSAGAR A.NAGAR

➢ **पुण्यस्य फलमिच्छन्ति पुण्यं नेच्छन्ति मानवाः।**
**फलं वापस्य नेच्छन्ति पापं कुर्वन्ति नित्यशः॥६॥**

उत्तर: माणसे सत्कर्माच्या फळाची इच्छा करतात. पुण्य (मात्र) करत नाहीत. पापाच्या फळाची इच्छा करत नाहीत. दुष्कर्म मात्र नेहमी करतात.

➢ **नष्टं द्रव्यं लभ्यते कष्टसाध्यम्**
**नष्टा विद्या लभ्यतेऽभ्यासयुक्ता।**
**नष्टारोग्यं सूपचारैः सुसाध्यम्**
**नष्टा वेला या गता सा गतैव॥७॥**

उत्तर: संपत्ती नष्ट झाली तर ती परिश्रमाने मिळण्याजोगी असल्याने पुन्हा मिळवता येते. नष्ट झालेली विद्या अभ्यासाची जोड दिल्याने पुन्हा मिळवता येते. नाहीसे झालेले आरोग्य योग्य उपचाराने पुन्हा मिळवता येते. (परंतू) जी वेळ (एकदा) निघुन गेली, तर जी गेली ती गेलीच.

➢ **साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थेभ्यः साधवो वरम्।**
**कालेन फलते तीर्थं सद्यः साधुसमागमः॥८॥**

उत्तर: सज्जनाचे दर्शन पुण्यकारक असते. तीर्थक्षेत्रांपेक्षा सज्जन श्रेष्ठ होत. तीर्थक्षेत्र बऱ्याच काळाने फळास येते. साधूंचा सहवास लगेच फळास येतो.

➢ **मधुना सिञ्चयेन्निम्बं निम्बः किं मधुरायते?**
**मूलं स्वभावदोषोऽयं कटुत्वं न विमुञ्चति॥९॥**

उत्तर: कडुनिंबावर मध शिंपडले तर कडुनिंब गोड होतो का? कडुनिंब मूळ स्वभावात असलेल्या दोषामुळे कडूपणा सोडत नाही.

## स्वाध्याय

**प्र. १ मराठीतून प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१) या जगात कोणते बोलणे शोभुन दिसते?**

उत्तर: जगात कृतीने सफल झालेले बोलणे शोभून दिसते. एखादी व्यक्ती जे बोलते तसेच स्वतःच्या कृतीत उतरवत असेल तरच बोलणे सफल होय. कारण कृती खेरीज नुसत्या बोलण्याला लोक मान देत नाहीत.

**२) कोणकोणत्या गोष्टी सफल होतात?**

उत्तर: एखाद्या गरजू व्यक्तीला जे दान दिले जाते ते सफल होते. ज्याप्रमाणे वाळवंटात पडलेला पाऊस, भुकेने व्याकूळ झालेल्या व्यक्तीला दिलेले जेवण, तसेच गरजूला दिलेले दान सफल होते.

**३) सज्जन व दुर्जनातील फरक ओळखा व लिहा.**

उत्तर: सुभाषितकाराने सुप व चाळणी यांच्या उदाहरणावरुन सज्जन व दुर्जन लोकांचा फरक सांगितलेला आहे. ज्याप्रमाणे सुप धान्यातील खडे, कोंडा बाजूला करते व स्वच्छ धान्य सुपात राहते. त्याप्रमाणे सज्जन लोक दोषांचा त्याग करतात व गुणांचा स्विकार करतात.
ज्याप्रमाणे चाळणी पिठाचा त्याग करते व कोंडा वर ठेवते, त्याचप्रमाणे दुर्जन गुणांचा त्याग करतात व दाषांचा स्विकार करतात.

**४) माणसे कशाची इच्छा करतात? कशाची इच्छा करत नाहीत?**

उत्तर: माणसे पुण्य कर्माच्या फळाची इच्छा करतात परंतु पुण्य करत नाहीत तर माणसे पापाच्या फळाची इच्छा करत नाहीत मात्र पाप कर्म नेहमी करतात.

**५) कोणकोणत्या गोष्टी माणसे पुन्हा मिळवू शकतात? व कोणत्या गोष्टी माणसे पुन्हा मिळवू शकत नाहीत?**

उत्तर: नष्ट झालेली संपत्ती माणसे परिश्रमाने परत मिळवू शकतात. नष्ट झालेली विद्या अभ्यासाने परत मिळवता येते. नष्ट झालेले आरोग्य योग्य उपचाराने परत मिळवता येऊ शकते. परंतु एकदा वेळ निघुन गेली कि पुन्हा मिळवता येत नाही.

**६) कोण तिघेजण वंदनीय आहेत? का?**

उत्तर: आई, वडिल व गुरु हे तिघे जण वंदनीय आहेत. कारण जीवन आईकडून प्राप्त होते. सामर्थ्य वडिलांकडून प्राप्त होते व विद्या गुरुकडून मिळते.

**७) कवीने कडुनिंबाचे उदाहरण कोणत्या संदर्भात दिले आहे?**

उत्तर: कडुनिंबावर मधाचा शिडकावा केला तरी तो आपली कटुता सोडत नाही, त्याप्रमाणे ज्याच्या स्वभावात दोष असतो तो किती बाह्य उपचार केले तरी जात नाही.

**प्र. २ कंसातील योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) ----- नमः। (सरस्वतीं, सरस्वत्यै, सरस्वति)
ज्याला नमस्कार त्याची चतुर्थी

२) साधवः ----- गृहन्ति। (गुणैः, गुणाः, गुणान्)

३) ----- पुण्यस्य फलम् नमः। (मानवः, मानवाः, मानव)

उत्तरे: १) सरस्वत्यै, २) गुणान्, ३) मानवाः

DNYANSAGAR A.NAGAR

**प्र. ३ जोड्या लावा.**

| | अ. | ब. |
|---|---|---|
| १. | साधूनां | अ) द्रव्यम्। |
| २. | दोषग्राही | ब) दर्शनं पुण्यम्। |
| ३. | कष्टसाध्यम् | क) दुर्जन:। |

उत्तरे :१) साधुनां – दर्शनं पुण्यम्।
२) दोषग्राही – दुर्जन:।
३) कष्टसाध्यम् – द्रव्यम्।

**प्र. ४ संधी सोडवा.**

१) नमोऽस्तु = नम: + अस्तु।
२) फलमिच्छन्ति = फलम् + इच्छन्ति।
३) चालनीव = चालनी + इव।
४) यद्दानम् = यत् + दानम्।
५) साधवो वरम् = साधव: + वरम्।
६) गुरुश्चेति = गुरु: + च + इति।
७) गतैव = गता + एव
८) सिञ्चयेन्निम्बम् = सिञ्चयेत् + निम्बम्।
९) पुण्यं नेच्छन्तिं = पुण्यं + न + इच्छन्ति।
१०) दोषोऽयम् = दोष: + अयम्।

**प्र. ५ समानार्थी संस्कृत शब्द लिहा.**

१) सौरभ: = परिमल:, सुगन्ध:, आमोद:
२) कुसुमम् = पुष्पम्, सुमम्, सुमनस:, प्रसूनम्
३) साधु: = सज्जन:, सुजन:, सत्, सत्पुरुष:
४) दुर्जन: = खल:, पिशुन:
५) द्रव्यम् = वित्तम्, रिक्थम्, धनम्, वसु, हिरण्यम्, अर्थ:
६) शारदा: = सरस्वती, भारती, भाषा, वाक्, वाणी, उक्ति:
७) अम्बुजम = पद्मम्, नलिनम्, अरविन्दम्, कमलम्, सारसम्, राजीवम्, पङ्कजम्, पुष्करम्, अम्भोरुहम्
८) वृष्टि: = पर्जन्य:, वर्षणम्, वर्षम्
९) क्षुध् = अशनाया, बुभुक्षा
१०) दरिद्र: = अकिञ्चन:, दीन:
११) मानव: = मानुष:, मनुष्य:, मनुज:
१२) पापम् = पङ्कम्, पाप्या, किल्बिषम्, कलुषम्, वृजिनम्, अधम्, दुरितम्, दुष्कृतम्
१३) सद्य: = सपदि, तत्कालम्, त्वरितम्, तूर्णम्, झटिति
१४) निम्ब: = अरिष्ट:, सर्वतोभद्र:, मालक:, पिचुमन्द:

**प्र. ६ विरुद्ध अर्थाचे संस्कृत शब्द लिहा.**

१) संपन्न ह्न विपन्न:
२) क्षुधा ह्न क्षुधाभाव:
३) गुण: ह्न अवगुण:, दोष:
४) उपकार: ह्न अपकार:
५) आरोग्यम् ह्न अनारोग्यम्
६) साध्यम् ह्न असाध्यम्
७) वृष्टि: ह्न अवृष्टि:
८) दरिद्र: ह्न धनिक:
९) सफलम् ह्न निष्फलम्, विफलम्
१०) दोषग्राही ह्न गुणग्राही
११) दुर्जन: ह्न सज्जन:
१२) पुण्यम् ह्न पापम्
१३) सुसाध्यम् ह्न दु:साध्यम्
१४) मधुरम् ह्न तिक्तम्, कटु

**प्र. ७ रुपे ओळखा.**

१) विराजते = वि + राज् (१ उभयपद) धातुचे आत्मनेपद, वर्तमानकाळ, तृतीय पुरुष एकवचन.
२) साधव: = साधु उ कारान्त पुलिंगी नामाचे प्रथमा–संबोधन बहुवचन.
३) इच्छन्ति = इष् – इच्छं (६ परस्मैपद) धातुचे वर्तमानकाळ तृतीय पुरष बहुवचन.
४) वृष्टि: = वृष्टि (इ कारान्त स्त्रीलिंगी) नामाचे प्रथमा एकवचन.
५) पिता = पितृ (ऋकारान्त पुलिंगी) नामाचे प्रथमा एकवचन.

**प्र. ८ खालील प्रश्नांची संस्कृतमधून उत्तरे लिहा.**

**१) केन संपन्नं कुसुमं शोभते?**
उत्तर: वर्णेन सौरभेण च संपन्नं कुसुमं शोभते।
**२) लोके कीदृशं वाक्यं विराजते?**
उत्तर: लोके क्रियया फलितं वाक्यं विराजते।
**३) साधव: किं कृत्वा गुणान् गृहन्ति?**
उत्तर: साधव: शूर्पवत् दोषान् विसृज्य गुणान् गृहन्ति।

DNYANSAGAR A.NAGAR

४) नष्टं द्रव्यं कथं लभ्यते?

उत्तर: नष्टं द्रव्यं कष्टेन लभ्यते।

५) अपि नष्टा वेला पुन: प्राप्यते?

उत्तर: न एव, नष्टा वेला पुन: न प्राप्यते। या वेला गता सा गता एव।

६) साधुनां दर्शनं कीदृशं भवति?

उत्तर: साधुनां दर्शनं पुण्यं भवति।

७) निम्ब: किं न विमुञ्चति?

उत्तर: निम्ब: स्वं कटुत्वं न विमुञ्चति।

*****

नोटस्

DNYANSAGAR
A.NAGAR